दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक १५० • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.२४ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

### मोदी सरकारचा निषेध, तहसिलदारांना निवेदन

# महागाईच्या विरोधात रायगडात शेकापचे आंदोलन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**रायगडात शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने इंधन, गॅस आदी जीवनावश्यक वस्तुंच्या दरात होत असलेल्या दरवाढीचा सोमवारी निषेध व्यक्त करण्यात आला. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील तहसिलदारांना शेकापच्यावतीने निवेदन देऊन केंद्र सरकारचा जाहीर निषेधही करण्यात आला.**



शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या निर्देशा नुसार जिल्हा चिटणीस ॲड.आस्वाद पाटील यांनी गॅस, पेट्रोल, डिझेल या वस्तूंच्या दरवाढीविरोधात सर्व तहसीलदार कार्यालयात निवेदन देण्याची सूचना केली होती. त्याप्रमाण अलिबाग, रोहा, खालापूर, पेण, पनवेल, तळा, म्ह-सळा, महाड, कर्जत, मरुड, उरण, सुधागड-पाली, श्रीवर्धन, माणगाव, पोलादपूर या सर्व तालुक्यांमध्ये शेकापच्या वतीने तहसीलदार कार्यालयात निवेदन देण्यात आले.

केंद्र शासन घरगुती वापरात आवश्यक असलेल्या गॅस, पेट्रोल, डिझेल यांच्या किंमतीत सातत्याने वाढ करत आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यासह राज्यातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी उज्वला गॅस योजना सुरु केली. परंतु गॅस सिलिंडरची किंमत आता ९०० रुपयांवर पोहोचली आहे.

तसेच पेट्रोल, डिझेल तसेच जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत झालेल्या भरमसाठ वाढीमुळे व्यावसायिक, मच्छिमार व सामान्य मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

> सामान्य नागरिकांना महागाईचा प्रश्न भेडसावत आहे. त्याविरोधात शेकापच्या माध्यमातून तहसीलदारांना निवेदन देण्यात आलेय. प्रत्येक गोष्टीवर अर्थकारण अवलंबून आहे. गॅस व इंधन दर वाढतात तेव्हा त्याचा परिणाम सर्व व्यवसायांवर होतो. मूलभूत गरजा महाग होत असल्यामुळे नागरिकांना संताप झाला आहे.
>
> **- चित्रा पाटील,जि.प. सदस्य**

त्यामुळे गॅस, पेट्रोल, डिझेल तसेच जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती करण्यात याव्यात, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने अलिबाग तहसील कार्यालयात तहसीलदार सचिन शेजाळ यांच्याकडे निवेदन देऊन करण्यात आली.

जि.प. सदस्या चित्रा आस्वाद पाटील यांच्या हस्ते तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेही जि.प. सदस्य भावना पाटील, तालुका चिटणीस अनिल शांताराम पाटील, पं.स. सभापती प्रमोद ठाकूर, सदस्या रचना पाटील, माजी सभापती जनार्दन पाटील, माजी उपसभापती अनिल गोमा पाटील, जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य अनिल पाटील, अलिबाग न.प. पाणीपुरवठा सभापती राकेश चौलकर, नगरसेविका सुरक्षा शहा, वृषाली ठोसर, संजना किर, नगरसेवक अनिल चोपडा, महिला आघाडी शहर अध्यक्ष पल्लवी आठवले व कार्यकर्ते उपस्थित होते.

> मोदी सरकारने सत्तेत येण्यापूर्वी आश्वासन दिले, की गॅस व इंधन दर कमी होतील. पण, सत्ता आल्यानंतर पूर्ण उलटे झाले आहे. पेट्रोल, डिझेल तसेच जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वाढतच आहेत. त्यामुळे शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील यांनी याविरोधात आवाज उठवायचा ठरवला व याचा निषेध केला.
>
> **- अनिल शांताराम पाटील, तालुका चिटणीस**

# लोक कल्याणकारी महाराष्ट्र घडविण्याचे काम भाजपच करू शकतो : ना.नारायण राणे

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

तुम्हा-आम्हा सर्वांना अभिप्रेत असणारा लोककल्याणकारी महाराष्ट्र घडवण्याचे काम भारतीय जनता पक्षच करू शकतोय असा विश्वातस जनतेच्या मनात तयार करायचा आहे. असे प्रतिपादन ना.नारायण राणे यांनी केले.

केंद्रातील सूक्ष्म लघु आणि मध्यम या खात्याचे मंत्री नामदार नारायण राणे यांच्या जन आशीर्वाद यात्रेला दि.(२३) रोजी सुधागड तालुक्यातील पाली येथील बल्लाळेश्वर च्या दर्शनाने सुरुवात करण्यात आली. त्याप्रंगी तेथे उपस्थित असलेल्या नागरिकां बरोबर सवाध साधतांना ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्राचे भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील प्रदेश सचिव सुनील देवधर विरोधी पक्षनेते विधान परिषद प्रवीण दरेकर आमदार रवींद्र चव्हाण आमदार रवींद्र पाटील आमदार प्रशांत ठाकूर निलेश राणे श्याम सावंत देवेंद्र साटम जिल्हाध्यक्ष महेश मोहिते उपजिल्हा अध्यक्ष राजेश मापारा आदी मान्यवर उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सात वर्षात जी काही काम केली आहेत अनेक विधायक आणि सामाजिक योजना जाहीर केल्या आहेत त्या जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम या जन आशीर्वाद यात्रेच्या माध्यमातून करायचे आहे . तसेच सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांच्या माध्यमातून बेरोजगारांना काम द्यायचे आहे आर्थिक समृद्ध भारत बनवण्यासाठी देशाचा जीडीपी वाढून देशाचे उत्पन्न वाढवायचे आहे.

कोकणातील ही जन आशीर्वाद यात्रा पालीच्या बल्लाळेश्वरा च्या दर्शनाने सुरू झालेली आहे त्याच निमित्ताने आम्ही या पालीकरांचे आशीर्वाद घेण्यासाठी आलो आहोत. मंदिर बंद असो वा सुरू बाहेरुन घेतलेल्या मुखदर्शनाने देखील गणपती आम्हाला पावणारच आहे असा टोला यावेळी आमदार राणे यांनी विरोधकांना लगावला. आशीर्वाद यात्रेत रायगड सह सुधागड तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी तालुक्यातील वेगवेगळ्या समाजाच्या संघटनेने नामदार राणे यांचे स्वागत केले. व त्यांना तालुक्यातील काही कामाबाबत निवेदनही देण्यात आले. सुधागड तालुक्यातील या जन आशीर्वाद यात्रेचे उत्कृष्ठ नियोजन जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा यांचे मार्गदर्शनाखाली तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले.



## संक्षिप्त...

### आरोग्याला प्राधान्य देऊन सण काही काळ बाजूला ठेवू : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दहीहंडी सण साजरा करू देण्यासाठी गोविंदा पथकांच्या प्रतिनिधींची आज राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक झाली. यात मुख्यमंत्र्यांनी गोविंदा पथकांना जनतेच्या आरोग्याला प्राधान्य देऊन आपण सण, उत्सव काहीकाळ बाजूला ठेवू असं आव-हन करत दहीहंडीवर यंदाही निर्बंध असतील याबाबतचे संकेत दिले आहेत.

दहीहंडी सण थाटात साजरा करण्यासाठी शासनानं परवानगी द्यावी नाहीतर आंदोलन करु असा इशारा दहीहंडी मंडळांच्या प्रतिनिधींनी घेतला आहे. त्यात भाजपानंही दहीहंडी सण कोरोना संबंधीचे नियम पाळून साजरा करू देण्यास परवानगी देण्यास हरकत नाही अशी भूमिका घेतली आहे. सण साजरा करण्यासाठीच्या काही मागण्या घेऊन गोविंदा पथकांच्या प्रतिनिधींनी आज मुख्यमंत्री ठाकरेंसोबत बैठक केली. यात मुख्यमंत्री ठाकरेंनी जनतेचा जीव वाचवणं हेच आपलं प्राधान्य असलं पाहिजे, असं ठाम मत व्यक्त केलं आहे. जनतेच्या आरोग्याला प्राधान्य देऊन त्यांचे प्राण वाचविण्यासाठी आपण सण-वार, उत्सव काही काळासाठी बाजूला ठेवू, मानवता दाखवू आणि कोरोनाला हद्दपार करु, असा संदेश महाराष्ट्राने जगाला द्यायला हवा, अशी संयमी भूमिका मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतली आहे.

# स्थानिक प्रकल्पग्रस्तांना संधी द्या नाहीतर आंदोलन

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे सिडकोला पत्र

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोने बेलापूर-पेंधर मार्गावरील नवी मुंबई मेट्रो प्रकल्पात स्थानिक प्रकल्पग्रस्तांना रोजगार दिला जाईल, असे आश्वासन दिले होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे २५ ऑगस्ट रोजी भाजपच्या वतीने तळोजा येथील मेट्रोकार शेड येथे काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचा ईशारा भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोला दिला आहे तसेच त्यासंदर्भातील पत्र सिडकोच्या व्यस्थापकीय संचालकांना दिले आहे.



नवी मुंबईतील बेलापूर पेंधर मार्गावर धावणाऱ्या मेट्रोचे काम सिडकोने महामेट्रोकडे दिले आहे. येत्या डिसेंबर महिन्यात पेंधर ते खारघर सेंट्रल पार्क दरम्यान मेट्रो सुरू होण्याची शक्यता आहे. दरम्यान सिडकोने नवी मुंबई मेट्रो प्रकल्प सुरू करताना स्थानिकांना रोजगार दिले जाईल. तसेच नोकरीमध्ये सुशिक्षित प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य दिले जाईल, अशी हमी दिली होती.

प्रत्यक्षात मेट्रोच्या कारशेडचे काम पूर्णत्वास आले तरी अद्याप एकही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी, रोजगार देण्यात आलेला नाही. स्थानिकांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी तळोजा येथील मेट्रो कार शेड येथे २५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे. आंदोलन दरम्यान काही परिस्थिती उद्भवल्यास सिडको प्रशासन जबाबदार असेल असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी महामेट्रो आणि तळोजा पोलिसांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

### नेरळ ते कळंब रस्त्याची दुरावस्था खड्डेच खड्डे

# गणरायांचे आगमन खड्ड्यातून होणार



**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ ते कळंब हा रस्ता अतिशय धोकादायक अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत खड्ड्यामुळे या रस्त्यावरुन प्रवास करणे धोक्याचे झाले आहे हे खड्डे बुजवून रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

नेरळ कळंब रस्ता साईमंदिर ते धामोते आणि दहिवली पुलावर मोठ मोठ्या खड्डे पडलेले आहेत कदचित यंदा पाऊस जरा जास्त प्रमाणात पडल्यामुळे दहिवली ब्रिजवर रस्ताची डांबर गेली वाहून मोठ्या खड्डे पडल्यामुळे इथील दुचाकीस्वार रिक्षाचालक एसटी व इतर वाहनांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

येत्या १० सप्टेंबर रोजी गणेशोत्सवाला सुरवात होत आहे श्री गणरायांचे आगमन घरोघरीं होणार आहे आता पावसाने बऱ्यापैकी विशंराती घेतली आहे तरी गणेशोत्स-वापूर्वी या रस्त्याची डागडुजी करून घ्यावी नाही तर आंदोलन करावा लागेल आशी माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपतालुका प्रमुख यशवंत भंवारे यांनी दिली.

# सिडकोच्या मेट्रो मार्ग क्र. १ वर आरएसडीओकडून २८ ऑगस्टपासून घेण्यात येणार ऑसिलेशन चाचणी

### प्रवासी वाहतूक सुरू करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळाच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील बेलापूर ते पेंधर या मार्ग क्र. १ वर रिसर्च डिझाईन न्ड स्टँडर्ड ऑर्गनायझेशन (आरएसडीओ) कडून २८ ऑगस्ट २०२१ पासून मेट्रोची ऑसिलेशन चाचणी घेण्यात येणार आहे. आरएसडीओ यांच्याकडून सदर मार्ग क्र. १ वरील पेंधर स्थानक ते सेंट्रल पार्क स्थानका दरम्यानच्या ५.१४ कि.मी. च्या अंतरावर मेट्रोची ऑसिलेशन चाचणी आणि इमर्जन्सी ब्रेक डिस्टन्स चाचणी २८ ऑगस्ट २०२१ पासून घेण्यात येणार आहे.या मार्गावर प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरू करण्याच्या दृष्टीकोनातून ऑसिलेशन चाचणी महत्त्वाची ठरणार आहे.




नवी मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या आणि नवी मुंबईतील नोड परस्परांना अधिक सुलभरीत्या जोडले जावेत या उद्देशाने सिडकोतर्फे .../४

> प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरू करण्यापूर्वीचा ऑसिलेशन चाचणी हा महत्त्वाचा टप्पा आहे. ऑसिलेशन चाचणी पार पडल्यानंतर लवकरच मार्ग क्र. १ वर दोन टप्प्यांत प्रवासी वाहतूक सुरू करण्यात येणार आहे. यामुळे नवी मुंबईकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

### मंडळ अधिकारी संदीप रोडे यांची बदली

# एम.के.मोहिते नवे मंडळ अधिकारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मंडळ अधिकारी संदीप रोडे मंडळ अधिकारी जासई, उरण येथे बदली झाल्याने त्यांची जागी महसूल तहसील कार्यालय उरण येथील एम.के.मोहिते यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



मंडळ अधिकारी जासई तहसील कार्यालय उरण एस.आर.भंडारे यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी पनवेल येथील मंडळ अधिकारी संदीप रमाकांत रोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तर मंडळ अधिकारी संदीप रोडे यांच्या जागी महसूल अ.का.२, तहसील उरण येथील एम.के.मोहिते यांची वर्णी लागली आहे.

# विरोधी ऐक्याचे पुढचे पाऊल

संसदेचे पावसाळी अधिवेशन पूर्णपणे वाया गेले, पण त्यातूनच मरणासन्न विरोधी पक्षांमध्ये ऐक्याची धुगधुगी निर्माण झाली, हे नाकारता येणार नाही. मोदींच्या नेतृत्वाखालील बलवान केंद्र सरकारला कोंडीत पकडता आले नाही ही वस्तुस्थिती असली, तरी विरोधकांनी एकत्रितपणे केलेला विरोध, हेच खरे या अधिवेशनाचे फलित म्हणायला हरकत नाही. भाजपच्या सत्तेवर अंकुश ठेवायचा असेल, तर आपल्याला एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही, याचा साक्षात्कार समस्त विरोधी पक्षांबरोबरच काँग्रेसलाही झाला हेदेखील याच अधिवेशनाचे फलित. राष्ट्रीय पक्षाचे तुणतुणे वाजवून पराकोटीच्या अहंमन्यतेत काँग्रेस अगदी अलीकडेपर्यंत वावरत होती. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींनी भाजपला तर ठेचलेच; पण काँग्रेसचा उरलासुरला नक्षाही उतरविला. एवढेच नव्हे तर राजधानीत येऊन विरोधी नेत्यांच्या बैठका घेऊन केंद्रीय नेतृत्वाच्या दिशेने वाटचालही सुरू केली. ममतारूपी वावटळीचे वादळात रूपांतर होण्यापूर्वीच हालचाल करायला हवी; अन्यथा उरलीसुरली संघटनाही हातातून जायची असा विचार काँग्रेसच्या शीर्षस्थ नेत्यांनी म्हणजेच सोनिया गांधींनी केलेला दिसतो. प्रत्यक्ष काँग्रेसमध्येच ज्येष्ठांनी गांधी परिवाराच्या नाकात दम आणला असल्याने दोन पावले मागे येऊन विरोधी ऐक्याचा पुढाकार घेणे भाग पडलेले दिसते. संसदेत मल्लिकार्जुन खर्गेंचे नेतृत्व कसोटीस उतरले. राहुल गांधींनीही उथळपणा सोडून किमान गांभीर्याचा अनुभव दिला. परिणामी समस्त विरोधी पक्षांनी जोरकसपणे भाजपचा प्रतिकार केला. हाच धागा पकडून सोनियांनी १८ पक्षांच्या नेत्यांची बैठक बोलावली. ही आभासी बैठक भाजपला पर्याय करण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे सरकली, एवढे मात्र खरे. काँग्रेस कशी व किती जमिनीवर आली आहे, हे सोनिया गांधी यांच्या ऐक्याच्या वास्तवदर्शी भाषणातून लक्षात आले. प्रत्येकाची स्वत:ची एक अडचण असते. परंतु राष्ट्रहितासाठी त्याकडे दुर्लक्ष करून एकत्र यायला हवे. संसदेबाहेरही आपल्याला मोठी लढाई लढावी लागेल. त्यात काँग्रेस कोणतीही कसर बाकी सोडणार नाही, असे सोनिया म्हणाल्या. यातून त्यांची विरोधी ऐक्याची कळकळ तर दिसतेच; शिवाय त्यासाठी आपण काहीही करायला तयार आहोत याचेही दिशादर्शन होते. एकीकडे ही तळमळ व्यक्त होत असतानाच आप, अकाली दल, बिजू जनता दल या पक्षांना न बोलावून काँग्रेसने ऐक्यात फट राहील याचीच जणू तजवीज केली. समाजवादी पक्ष व बसप या उत्तर प्रदेशातील दोन प्रमुख पक्षांनी दांडी मारून या फटीची दरी होण्याची तयारी केली आहेच. एकीकडे काँग्रेस ऐक्यासाठी कोणतीही कसूर करणार नाही असे म्हणायचे व काही पक्षांना खड्यासारखे बाजूला करायचे, अशाने ऐक्यात बाधा तर येतेच; शिवाय प्रामाणिकपणाबद्दलही संशय येतो. राहुल गांधी यांची इनिंग फसल्याने सोनिया रिंगणात उतरल्या आहेत. अशा वेळेस स्वपक्षातील ज्येष्ठांनाही विश्वासात घेता येत नसेल तर इतर पक्षांच्या नेत्यांचे रागलोभ कसे सांभाळले जाणार हा प्रश्नच उरतोच. या आभासी बैठकीस राहुल, मनमोहनसिंग व अँटनी वगळता एकही प्रमुख नेता नव्हता. साहजिकच प्रथम स्वपक्षाची पुरेशी बांधबंदिस्ती करण्याची गरजही यानिमित्ताने अधोरेखित झाली. अर्थात तरीही शरद पवार, ममता बॅनर्जी, उद्धव ठाकरे, हेमंत सोरेन, स्टॅलिन आदींसह १८ प्रमुख पक्षांच्या नेत्यांची उपस्थिती भाजपलाही दुर्लक्षिता येणार नाही. राष्ट्रीय राजकारणात अद्याप आपण केंद्रस्थानी आहोत, हा संदेशही यानिमित्ताने सोनियांनी दिला. डाव्या पक्षांबरोबर तृणमूल काँग्रेस पक्ष चर्चेला एकत्र बसू शकतो तर अकाली दल, आपसारख्या थेट प्रतिस्पर्धींनाही निमंत्रित करण्यात काही गैर नव्हते. त्यासाठी काँग्रेसला आणखी लवचीक व वास्तववादी व्हावे लागेल. ही तर निव्वळ सुरुवात आहे. या सर्व पक्षांचे ताणेबाणे समजून, स्थानिक पातळीवर त्यांच्याशी जमवून घ्यावे लागेल. महाराष्ट्रातही अधूनमधून स्वबळाच्या दंडाच्या बेटक्या फुगविणाऱ्यांना आवरावे लागेल. उत्तर प्रदेशात अखिलेश व मायावती यांच्याशी कमीपणा घेऊन समझोता करण्याविना पर्याय नाही याची तर खूणगाठ बांधावी लागेल. भाजपविरोधात लढणाऱ्या, पण या आघाडीत येऊ न शकणाऱ्या काही पक्षांशी राष्ट्रीय पातळीवर व्यापक स्वरूपात एकोपा टिकविण्यासाठी मनाचा मोठपणा दाखवावा लागेल. शरद पवारांसारखा अनुभवी व मातब्बर नेता बरोबर असला, तरी वयोपरत्वे येणाऱ्या मर्यादा पाहता त्यांच्याकडूनही फार अपेक्षा ठेवता येणार नाहीत. दस्तुरखुद्द सोनियांनाही आजारपणामुळे बंधने आहेतच. राहुल गांधी यांचे नेतृत्व स्वीकारण्याच्या मानसिकतेत अद्यापही विरोधी नेते नाहीत. म्हणूनच राहुल यांच्या दरबारी राजकारणाला आवर घालावा लागेल. राजकारण हा काही फावल्या वेळात करण्याचा उद्योग नसून सातत्याने करण्याची ती एक जीवनधारा आहे, याचे शिंपण त्यावर करावे लागेल. तरच ऐक्याच्या स्वप्नरंजनाला प्रत्यक्षात आणता येईल.

# दिवा रोहा पॅसेंजर गाडी पूर्ववत करण्याबाबत तटकरेंना रेल्वे प्रवासी संघर्ष समितीचे निवेदन



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

दिवा रोहा मेमू पॅसेंजर गाडी चालू करण्याबाबत व पूर्वीच्या गाड्या थांबत होते त्या गाडयांना रोहा रेल्वे स्थानक थांबा मिळणे आधी मागण्यांसाठी रेल्वे प्रवासी संघर्ष समिती रोहा रायगड यांच्या वतीने लेखी निवेदन देण्यात आले आहे.

रायगडचे खासदार सुनिल तटकरे, रायगडचे पालकमंत्री अदितीताई तटकरे, विधान परिषद आमदार अनिकेत तटकरे यांना लेखी निवेदन रेल्वे प्रवासी संघर्ष समिती रोहा रायगड अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, उपाध्यक्ष पुरुषोत्तम देशमुख सचिव उदय शेलार, उदय मोरे, उल्हास मुद्राळे या संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्याने दिले. तसेच आमदार रवीशेठ पाटील, आमदार महेंद्रशेठ दळवी, विधान परिषद आमदार रमेशदादा पाटील, रायगड जिल्हा अधिकारी, पब्लिक रिलेशन ऑफिसर, सेंट्रल रेल्वे मुंबई, विभागीय व्यवस्थापक सेंट्रल रेल्वे मुंबई, रा. जि . प. उपाध्यक्ष ऍड आस्वाद पाटील, कदम पोलीस निरीक्षक रोहा रेल्वे स्टेशन, रोहा पोलीस निरीक्षक, प्रांत अधिकारी माने रोहा, कविता जाधव तहसीलदार रोहा, यांना ही याबाबत लेखी निवेदन देण्यात येणार आहेत. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना ई-मेल द्वारे निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती रेल्वे प्रवासी संघर्ष समिती वतीने देण्यात आली

यावेळी आमदार अनिकेत तटकरे यांना रोहा येथील कार्यक्रमात निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी जिल्हा कार्याध्यक्ष मधूशेठ पाटील प्रदेश सरचिटणीस, विजयराव मोरे तालुका अध्यक्ष विनोद भाऊ पाशिलकर रोहा पंचायत समिती उपाध्यक्ष रामचंद्र सकपाळ युवक अध्यक्ष जयवंत मुढे यांच्याशी रेल्वे प्रवासी संघर्ष समिती रोहा रायगड अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, उपाध्यक्ष पुरुषोत्तम देशमुख सचिव उदय शेलार, उदय मोरे, उल्हास मुद्राळे उपस्थित होते.

# अबोली महिला रिक्षा चालकांसोबत रंगली इनरव्हील सख्यांची मंगळागौर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इनर व्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउनच्या कार्यक्षम अध्यक्षा वृषाली सावळेकर यांनी जनरल मिटिंग मध्ये मंगळागौरीचे आयोजन केले होते. मंगळागौरी चे महत्त्व आजच्या तरुण पिढीला समजावे आणि सर्व मेंबर्स चा उत्साह वाढावा यासाठी याचे आयोजन केले होते. 'नाच ग घुमा' या मंगळागौरी कार्यक्रम ग्रुपच्या प्रमुख सुनिता खरे आणि त्यांच्या सख्यांनी खूप सुंदर रीतीने खेळांचे विविध प्रकार सादर केले. सर्व इनरव्हील सदस्य व अबोली महिला रिक्षाचालक यांना आवर्जून भाग घ्यायला लावला. यात सगळ्याजणी आनंदाने व उत्साहाने सहभागी झाल्या. उत्कृष्ट लेखिका, निवेदिका, कीर्तनकार सुनिता खरे यांनी या कार्यक्रमात मंगळागौरीच्या खेळांचे महत्त्व अतिशय सुंदर रीतीने पटवून दिले.

'आई डे केअर' या संस्थेच्या विशेष मुलांनी बनवलेल्या राख्या यावेळी सर्व इनरव्हील सदस्यांनी विकत घेऊन एकमेकीना बांधून 'मैत्री दिन' साजरा केला. या राख्यांचे वैशिष्ट्य म्हणजे या राख्यांवर विविध प्रकारच्या भाज्या, फळे यांच्या बिया चिटकवलेल्या आहेत. रक्षाबंधना नंतर या राख्या मातीच्या कुंडीत लावल्या की त्यांची रोपे तयार होतात. यामुळे या संस्थेला देखील मदत झाली. यावेळी इनरव्हील सदस्यांनी आपल्या घरून विविध प्रकारची रोपे आणून एकमेकींना दिली. ही संकल्पना प्रेसिडेंट वृषाली सावळेकर यांची होती. पर्यावरण संतुलनासाठी हा एक छोटासा प्रयत्न आहे असे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात अबोली महिला रिक्षा चालकांना रोपे देऊन त्यांच्या कामाचे कौतुक करून त्यांचा सन्मान केला. यावेळी सर्व अबोली महिला रिक्षाचालकांचा आनंद चेहेर्युवर झळकत होता. आधी महिलांनीच महिलांच्या कामाचे कौतुक करायला हवं. हा यामागील हेतू होता. या सर्व कार्यक्रमाची संकल्पना प्रेसिडेंट वृषाली सावळेकर यांची होती. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी क्लबच्या सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य या वेळी लाभले. लोकप्रिय माजी नगराध्यक्षा आणि क्लब मेंबर चारूशिला घरत यावेळी आवर्जून उपस्थित राहून विविध खेळात सहभागी झाल्या.



# अलिबाग रायगड तर्फे सावरसई आश्रमात केला रक्षाबंधन सण साजरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तेजस्विनी सामाजिक व सांस्कृतिक फाऊंडेशन अलिबाग - रायगड तर्फे नुकताच सावरसई येथील आश्रमात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वसतिगृहाचे संचालक प्रकाश पाटील यांनी तेजस्विनी फाऊंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. तर वसतिगृहातील मुलांनी खुप छान पद्धतीने गाणं म्हणून सर्वांना मंत्रमुग्ध केले. तेजस्विनी फाऊंडेशनचे देवेंद्र केळुस्कर यांनी मुलांना रक्षाबंधन व नारळी पौर्णिमा या सणाचे महत्व समजावून सांगितले तर पदाधिकारी राखी विजय पाटील यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, संत गाडगेबाबा यांची उदाहरणे देवून इच्छाशक्ती असेल तर नक्कीच चांगले मार्ग दिसतील असे सांगून जाताना आपण घेवून काही जात जरी नसलो तरी समाजाला खूप काही देवून गेलं पाहिजे असा संदेश मुलांना दिला.

# गेल्या २४ तासांत ६,७९५ रुग्ण कोरोनामुक्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील जनतेसाठी दिलासादायक असे वृत्त आहे. नव्या कोरोना बाधितांपेक्षा कोरोनामुक्त होणाऱ्या रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून जारी करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या २४ तासांत ६ हजार ७९५ रुग्ण कोरोनामुक्त झाले असून, यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण म्हणजेच रिकव्हरी रेट ९७.०५ टक्क्यांवर गेला आहे. तर, गेल्या २४ तासांत राज्यात एकूण ३ हजार ६४३ नव्या कोरोनाबाधित रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. गेल्या २४ तासांत राज्यात ३ हजार ६४३ नव्या कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. तर, याच कालावधीत १०५ रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. तसेच ६ हजार ७९५ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत.


## जाहीर सूचना
## पनवेल महानगरपालिका
## महिला व बाल कल्याण विभाग

पनवेल महानगरपालिका महिला व बाल कल्याण विभागामार्फत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग निहाय मुली व महिलांना बेकरी प्रॉडक्ट केक तयार करणेकामीचे व्यावसायिक प्रशिक्षण घेणेकामी आवश्यक नमुन्यातील अर्ज महिला बाल कल्याण विभागात उपलब्ध करून दिला जाईल. सदर अर्ज स्वीकारणेची अंतिम दि.३०/०९/२०२१ पर्यंत असेल मुदतीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तरी पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग निहाय महिला / मुलींनी जास्तीत जास्त प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा ही विनंती.

अटी व शर्ती :-

१) कुटुंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान ३ वर्षे वास्तव्य असलेबाबत पुरावा म्हणून मालमत्ता धारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती / निवडणूक ओळखपत्र / मतदार यीतील नांव / पाणीपट्टी बिल / वीज बिल, आधार कार्ड / ३ वर्षाचा भाडे करारनामा / पारपत्र (Passport) रेशनकार्ड / विवाह नोंदणी दाखला / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक पुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणताही १ पुरावा)

२) लाभार्थ्याचे वय १८ ते ५० वर्षे वयोगटामधील असावेत.

३) तहसीलदारांकडील ३ लाखांपेक्षा कमी (अल्प उत्पन्न) असलेबाबतचा दाखला आवश्यक राहील.

४) अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे सवक्षांकित केलेली असावीत.

५) अर्जासोबत अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक राहील.

६) प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेच्या दहा टक्के रक्कम लाभार्थ्याचे स्वतः भरावयाची आहे.

७) लाभधारकाने प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास अथवा प्रशिक्षण पुर्ण न केल्यास जमा केलेली रक्कम परत मिळणार नाही. तसेच महानगरपालिकेच्या कोणत्याही योजनेचा लाभ देण्यात येणार नाही.

८) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने लाभ देणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त यांना राहील.

९) सन्मा.नगरसेवक / नगरसेविका यांचे पत्र दाखल केलेल्या अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१०) प्रथम येणाऱ्या लाभार्थ्यांस प्राधान्य दिले जाईल.

सही/-
(तृप्ती सांडभोर)
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

पमपा/मबाक/३७२१/प्र.क्र.१/जा.क्र.५८/२०२१
दिनांक : २३/०८/२०२१


पृष्ठ क्र.१ वरुन...

# २८ ऑगस्टपासून घेण्यात येणार ऑसिलेशन चाचणी

नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण ४ उन्नत मार्ग (एलिव्हेटेड कॉरिडॉर) विकसित करण्यात येत आहेत. यांपैकी ११.१० कि.मी. लांबीच्या, तळोजा येथे आगार (डेपो) असलेल्या मार्ग क्र. १ वर मेट्रोची यशस्वी चाचणी घेण्यात आली होती. या मार्गावरील उर्वरित कामे पूर्ण करण्याकरिता सिडकोकडून महा मेट्रोची नियुक्ती करण्यात आली असून मुख्य व्हायडक्ट, आगार प्रवेश व्हायडक्ट, आगार व कार्यशाळा उभारणीची कामे पूर्ण झाली आहेत. तर स्थानकांची उभारणी, लिफ्ट, उद्ववाहन, फर्निचर आणि प्रणाली ही कामे प्रगतीपथावर आहेत.

भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयांतर्गत असणाऱ्या आरएसडीओ यांच्यावर देशातील विविध रेल्वे प्रणालींमध्ये प्रमाणीकरण आणि समन्वय साधण्याची जबाबदारी असते. आरएसडीओ यांच्याकडून सदर मार्ग क्र. १ वरील पेंधर स्थानक ते सेंट्रल पार्क स्थानका दरम्यानच्या ५.१४ कि.मी. च्या अंतरावर मेट्रोची ऑसिलेशन चाचणी आणि इमर्जन्सी ब्रेक डिस्टन्स चाचणी २८ ऑगस्ट २०२१ पासून घेण्यात येणार आहे. प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक सुरू करण्याच्या दृष्टीने चाचपणी म्हणून ऑसिलेशन चाचणी अत्यंत महत्त्वाची ठरते. ऑसिलेशन चाचणी पार पडल्यानंतर लवकरच मार्ग क्र. १ वर पहिल्या टप्प्यात स्थानक क्र. ७ ते ११ आणि दुसऱ्या टप्प्यात स्थानक क्र. १ ते ११ दरम्यान प्रवासी वाहतूक सुरू करण्यात येणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चिंचवण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील श्री.संतोष जगन्नाथ भगत यांचे मालकीची व ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन मिळकत मी कायम स्वरुपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चिंचवण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री.संतोष जगन्नाथ भगत | ४ | ६ | जिरायत ०-७-६०<br>पो.ख. ०-१-१० | १.१९ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज, लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि.२३/०८/२०२१
पनवेल

सही/-
ॲड.प्रविण दत्तू पाटील
हरिओम नगर फ्लॅट नंबर बी-२,
तळमजला, कफ नगर ठाणा नाका जुने
पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
मो.नं.९९२०९९५९९६



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : महोदर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली सविस्तरपणे नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : महोदर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| जमिन मालकांचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| महित पंकज पटेल<br>शिवजी वस्ता चौधरी<br>पांचा भचचु चौधरी<br>दिपांजली योगेश तांडेल<br>आर्चिस योगेश तांडेल | ७६/५/२ | १-४२-८०<br>पो.ख. ०-१५-६०<br>एकूण १-५८-४०<br>पैकी १-२०-००<br>विक्रीस असलेले क्षेत्र | २०.०७ |

वर सविस्तरपणे नमूद केलेल्या मिळकतीचे एकूण क्षेत्र १-५८-४० हे.आर.चौ.मी. पैकी महित पंकज पटेल, शिवजी वस्ता चौधरी, पांचा भचचु चौधरी यांचे सामाईक मालकीचे क्षेत्र १-००-०० हे.आर.चौ.मी आणि आर्चिस योगेश तांडेल यांचे मालकीचे ०-२०-०० हे.आर.चौ.मी. असे एकूण क्षेत्र १-२०-०० हे.आर.चौ.मी. असे क्षेत्र या नोटीशीचा विषय आहे.

तरी सदरहू वर नमूद मिळकतीबद्दल कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२३/०८/२०२१

सही/-
सुवर्णा म. वत्सराज
ॲडव्होकेट, पनवेल
फ्लॅट नं.३०४, अदित्य विहार
सोसायटी, जुन्या पोस्टाजवळ,
महात्मा फुले रोड, ता.पनवेल,
जि.रायगड ४१०२०६
फोन नं.९८३३६३९०४१



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली सविस्तरपणे नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने सदरहू मिळकतीचे मालकी हक्क निर्वेध असल्याबाबतचा दाखला खाली सही करणार यांस जारी करण्याचा आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील बिनशेती सर्व्हे / गट नं.९५/0 वर बांधण्यात आलेली ग्रीन फिल्ड को. हौ.सो.लि. या इमारतीतील डी-३०२, तिसरा मजला, डी विंग, अदमासे २९.९०० चौ.मी. (चटई क्षेत्र) म्हणजे ३२२ चौ.फूट (चटई क्षेत्र) आणि फ्लॉवर बेड / बाल्कनी अदमासे ५.७०० चौ.मी. किंवा ६१.00 चौ.फूट टेरेससह अदमासे १.८०० चौ.मी. म्हणजेच १९.00 चौ.फूट**

तरी सदरहू वर नमूद मिळकतीबद्दल कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अथवा अपूर्ण (पेंडींग) व्यवहार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्याचप्रमाणे खाली सही करणार हे सदरहू मिळकती निर्वेध असल्याबाबतचा दाखला जारी करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२३/०८/२०२१

सही/-
स्वप्निल अ. उपाध्ये
ॲडव्होकेट, पनवेल
फ्लॅट नं.१, पहिला मजला,
जोशी आळी, पटेल हॉस्पिटल
जवळ, पनवेल, ता.पनवेल,
जि.रायगड-४१०२०६
मो.नं.९०२९१६१९१४



मा.गोडसे मॅडम कोर्ट
ॲड.सुनील एन. मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर/क.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९५४/२०२१
ने.ता.२३/०९/२०२१

१) श्री.शुभेन्दु शंभुकुमार दत्ता गुप्ता
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.११, न्यु खातीपुरा कॉलनी,
इंदौर, मध्य प्रदेश-४५२०१०
२) श्री.सुमित शंभुकुमार दत्ता गुप्ता उर्फ दुत्ता गुप्ता
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.१३०२, किस्टोन, एलीटा, प्लॉट नं.४९,
सेक्टर १५, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१० अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ व २ यांची आई कै.शिखा शंभुकुमार दत्ता गुप्ता उर्फ दुत्ता गुप्ता यांच्या नावाने सिडकोकडे नोंदीत आहे. अर्जदार नं.१ व २ यांची आई कै. शिखा शंभुकुमार दत्ता गुप्ता उर्फ दुत्ता गुप्ता या दि.१०/०४/२०२१ रोजी अपोलो हॉस्पिटल इन्टरप्रायझेस लिमिटेड, प्लॉट नं.१३, सेक्टर २३, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील हॉस्पिटलमध्ये मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ व २ यांचे वडील कै.शंभुकुमार अबितकुमार दत्ता गुप्ता हे दि.२४/०८/२०१० रोजी सीएचएल अपोलो हॉस्पिटल इंदौर मध्य प्रदेश येथे मयत झालेले आहेत. कै.शिखा शंभुकुमार दत्ता गुप्ता उर्फ दुत्ता गुप्ता यांच्या नावाने सिडको कार्यक्षेत्रात खालील वर्णनाची मिळकत सिडकोकडे नोंदीत आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे सिडको हद्दीतील फ्लॅट नं.१३०२, तेरावा मजला, किस्टोन एलिटा, प्लॉट नं.४९, सेक्टर नं.१५, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदाराच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२०/०८/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोटाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आर्या वनौषधीचा आगळावेगळा रक्षाबंधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाऊ बहिणीच्या पवित्र नात्याची महिमा विशद करणारा सण म्हणजे रक्षाबंधन. या दिवशी बहिण आपल्या भावाला राखी बांधून त्याला दीर्घायुष्य मिळावं यासाठी प्रार्थना करते तर भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणाचं वचन देत असतो. यातही पर्यावरण संवर्धनाचे रक्षण झालं पाहिजे म्हणून याचं दिवसाचे औचित्य साधून आर्या वनौषधी संस्थेने रक्षाबंधन हा सण आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला. रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणींनी भावांना रोपे भेट देवून पर्यावरण रक्षण करण्याचे वचन घेतले.

आर्या वनौषधीचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी या संदर्भात केलेल्या आवाहनास डहाणू, बोईसर, अलिबाग, पेण, पनवेल, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, यवतमाळ, उरण आदी भागातील महिलांचा उदंड प्रतिसाद लाभला. विशेष म्हणजे यात लहान मुलेही सहभागी झाली होती. सदर दिवशी १९०२ बहिणींनी आपल्या भावांना रोपे भेट देवून पर्यावरण संवर्धनाचे वचन घेतले. आर्या वनौषधींच्या या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले आहे. वनौषधी तज्ञ सुधीर पाटील यांचे पर्यावरण संवर्धनाचे वेगवेगळे प्रयोग सुरू असतात. पर्यावरण रक्षाबंधन हा त्यांचा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे असे मत अक्षर विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनिल म्हात्रे यांनी यावेळी व्यक्त केले. तर डॉक्टर चारुशिला सरोदे यांनी, सुधीर पाटील यांची वृक्षारोपण, संवर्धन या बद्दल असलेली तळमळ खूपच प्रेरणादायी आहे. त्याचे हे कार्य असेच बहरत राहो अशा शुभेच्छा दिल्या.



## पांगलोली आदिवासी वाडीवर आरोग्य तपासणी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

शांतिदूत परिवार व ग्रामीण रूग्णालय म्हसळा यांच्या संयुक्त विद्यमाने, नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाचे औचित्य साधून म्हसळा तालुक्यातील पांगलोली आदिवासी वाडी येथे मोफत आरोग्य शिबिर आयोजित केले. याप्रसंगी शांतीदूत परिवारच्या राष्ट्रीय अध्यक्षा तृषालीताई जाधव, म्हसळा ग्रामीण रूग्णालयाच्या डॉ. सोनाली अलंकार करंबे (स्त्रीरोगतज्ज्ञ) व तनिषा भायदे फार्मसिस्ट, आर्यन, योगेश आदि मान्यवर उपस्थित होते. आदिवासी भागातील जनतेच्या राहणीमानाचा दर्जा कमी होत असून त्यांचे अज्ञान, मागासलेपणा, कुपोषण, निरक्षरता, जंतु संसर्ग इत्यादीमुळे आदिवासी भागात वेगवेगळया रोगांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे शांतिदूत परिवार आणि ग्रामीण रुग्णालय म्हसळा, आदिवासी भागात आरोग्य सेवा वेळेवर व प्रभावीपणे पुरविण्यासाठी प्रयत्नशील आहे आणि या सेवाभावी कार्यासाठी तज्ञ डॉक्टरांच्या सहाय्याने तालुक्यात अनेक ठिकाणी अश्याप्रकाराची मोफत आरोग्य शिबीरे आयोजित करून आदिवासी बांधवाना या शिबिरातून जास्तीत जास्त फायदा मिळावा हर यामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

# मोठ्या प्रमाणात उद्योजक झाले तर बेकारी राहणार नाही : ना.नारायण राणे

## वाकणनाक्यावर जन आशीर्वाद यात्रेचे जोरदार स्वागत : वाकणनाका झाला भाजपामय

**दै.रायगड नगरी । वाकण**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आशीर्वादाने मला केंद्रीय कॅबिनेट मंत्रिपद मिळाले. मी केंद्रीय मंत्री झाल्यानंतर तुम्ही तुमच्या राज्यात जाऊन जनतेचा आशीर्वाद घ्या व माझे काम जनतेपर्यंत पोहचवा असा आदेश नरेंद्र मोदींनी मला दिल्यानंतर मी आज आपला आशीर्वाद घेण्यासाठी आलो आहे. नरेंद्र मोदींनी आपल्या भारत देशाला विकासाकडे घेऊन जाण्याचा निर्धार केला असून भारताला महासत्ता बनविण्याचा त्यांचा मानस आहे. म्हणून त्यांनी मला महत्वाचे असे उद्योग खात्याचे मंत्रिपद दिले आहे. तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजक व्हा ! आयात करण्यापेक्षा निर्यात वाढावा. निर्यात वाढली तर आर्थिक क्षमता देखील वाढते. उद्योजक तरुणांना माझे अधिकारी योग्य ते मार्गदर्शन करतील. त्यांना माझ्या उद्योग मंत्रिपदाचा निश्चितच लाभ होईल. रोहा तालुक्यात मोठया प्रमाणात उद्योजक झाले तर येथे बेकारी राहणार नाही आर्थिक सुबत्ता वाढेल असा सल्ला यावेळी केंद्रीय उद्योगमंत्री ना.नारायण राणे यांनी उपस्थित तरुण वर्गाला दिला.

केंद्रीय कॅबिनेटमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर उद्योगमंत्री नारायण राणे हे कोकणात भारतीय जनता पक्षाचा जनाधार व पक्षसंघटना मजबूत व बलाढ्य करण्याच्या दृष्टीने सरसावले असून सोमवार दि. २३ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता त्यांनी पाली येथील श्री बल्लाळेश्वराचे दर्शन घेतल्या नंतर दक्षिण रायगड जिल्हा जन आशीर्वाद यात्रेला शुभारंभ केला. त्यानंतर दुपारी १.३० वाजता जन आशीर्वाद यात्रेचे नागोठणे जवळील वाकणनाका येथे आगमन झाल्यानंतर नागोठणे विभाग भारतीय जनता पक्षाच्या वतीने यात्रेचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ना. नारायण राणे बोलत होते.

केंद्रीय मंत्री ना.नारायण राणे यांच्या समवेत महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते प्रविणभाऊ दरेकर, आमदार रविशेठ पाटील, माजी खाजदार निलेश राणे, रायगडचे माजी पालकमंत्री आमदार रविंद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, कोकण म्हाडाचे माजी सभापती



बाळासाहेब पाटील, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, मारुती देवरे, रोहा ता. अध्यक्ष सोपानभाऊ जांबेकर आदींसह भाजपाचे कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

दरम्यान जन आशीर्वाद यात्रेचे स्वागता निमित्त संपूर्ण वाकण नाक्यावर कमान उभारून सर्वत्र भाजपाचे झेंडे लावण्यात आले होते. त्यामुळे वाकणनाका भाजपामय झालेला दिसून येत होता. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहा तालुका अध्यक्ष सोपानभाऊ जांबेकर यांनी विशेष मेहनत घेतली होती. या वेळी भाजपा रोहा तालुका, भाजपा नागोठणे महिला विभाग, महिला बचत गट, स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती, श्री राम समर्थ दिव्यांग सामाजिक संस्था रोहा, भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था नागोठणे, वाकण व्यापारी संस्था आदींच्या वतीने ना. नारायण राणे यांना निवेदन देण्यात आले.

## नवीन मोबाईलची मागणी...

# अंगणवाडी सेविकांनी शासनाने दिलेले मोबाईल केले परत

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातल्या अलिबाग तालुक्यातील अंगणवाडी सेविकांना देण्यात आलेले पॅनासोनिक कंपनीचे मोबाईल वापरण्यास निकृष्ठ आणि नवीन अपलोड केलेले पोषण ऍप हे इंग्रजी मधून असल्याने सेविकांना कामात अडचणी येत आहेत. अलिबाग तालुक्यातील अंगणवाडी सेविकानी आज अलिबाग पंचायत समिती कार्यालयात असलेल्या आयसीडीसीच्या प्रकल्प अधिकारी गीतांजली पाटील यांना आपले मोबाईल परत करून आंदोलन केले. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलीक यांच्याकडे याबाबत निवेदन अलिबाग तालुका प्रमुख जिविता पाटील यांच्या नेतृत्वाखालील अंगणवाडी सेविका शिष्टमंडळाने दिले आहे. आम्हाला नवीन मोबाईल द्या, ऍप मराठी मधून द्या आणि रजिस्टर द्या अशी मागणी निवेदनामार्फत अंगणवाडी सेविकांनी शासनाकडे केली आहे.



अंगणवाडी सेविकाचे काम सुलभ आणि जलद व्हावे यासाठी शासनाच्या महिला व बाल कल्याण विभागाकडून अंगणवाडी सेविकांना २०१९ साली पॅनसोनिक कंपनीचे मोबाईल दिले होते. यासोबत सिमकार्डसोबत मोबाईल रिचार्ज खर्चही शासनामार्फत दिला जात होता. अंगणवाडी सेविकांना मोबाईलमध्ये पोषण ट्रेकर ऍप देण्यात आले होते. या ऍपमध्ये मराठीत पोषण आहार, मुलांची, स्तनदा माता, लसीकरण, सर्व्हे याची माहिती भरली जात होती. त्यामुळे काम सोपे झाले होते. मात्र काही दिवसांनी मोबाईलला तांत्रिक अडचणी येऊ लागल्याने ते बंद पडू लागले. अनेक अंगणवाडी सेविकानी स्वतः २ ते ३ हजार रुपये खर्च करून रिपेअर करून घेतले. मात्र तुटपुंज्या मानधनामुळे हा खर्च सेविकांना परवडणारा नाही.

पोषण ट्रेकर ऍप मध्ये बदल करण्यात आला असून हे ऍप आता इंग्रजी मध्ये केले आहे. इंग्रजी मध्ये आता संपूर्ण माहिती भरावी लागत आहे. अनेक अंगणवाडी सेविका यांचे शिक्षण कमी असल्याने इंग्रजीत माहिती भरणे कठीण जात आहे. अंगणवाडी सेविका काम करताना महत्वाचे म्हणजे त्यांना गावाचा सर्व्हे करून माहिती घ्यावी लागते आणि ती माहिती ऍप मध्ये भरावी लागते. मात्र नवीन ऍप मध्ये सर्व्हे ऑप्शन दिला नसल्याने माहिती अपूर्ण राहत आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविकांना अडचणी निर्माण होत आहे.

शासनाने दिलेला पॅनेसोनिक मोबाईल वापरण्यास निकृष्ठ असून खर्च परवडणारा नाही. त्यामुळे आम्ही हा मोबाईल प्रशासनाकडे परत करीत आहोत. मोबाईल वापरण्यास अंगणवाडी सेविकांची कोणतीही अडचण नाही. मात्र पोषण ट्रेकर ऍप हे मराठीत करावे, शासनाने नवीन मोबाईल द्यावे, रजिस्टर द्यावे ह्या प्रमुख मागण्या सेविकांच्या आहेत. अंगणवाडी सेविकांनी मोबाईल प्रशासनाकडे परत दिल्याने पुन्हा या सेविकांना रजिस्टरवर माहिती भरून सादर करावी लागणार आहे.

# कोकण विभागातील सेवानिवृत्त महसूल अधिकाऱ्यांचा पुरग्रस्तासाठी मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

कोकण विभागात २१ व २२ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे रायगड आणि रत्नागिरी जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर पुरपरिस्थिती निर्माण झाली आहे. बाधित शहर आणि गावांमध्ये लोकांना मदत करण्यासाठी विभागीय महसूल आयुक्त कोकण विभाग विलास पाटील यांनी दानशूर व्यक्ती/संस्था/एनजीओ यांना मदत करण्यासाठी आवाहन केले होते.

या आवाहानाला प्रतिसाद देत कोकण विभागातील सेवानिवृत्त महसूल अधिकारी यांच्यावतीने रायगड आणि रत्नागिरी जिल्हयातील पुरग्रस्तांना मदत म्हणून रुपये एक लाख सहा हजार निधी जमा करण्यात आला आहे.

या निधीचे रायगड व रत्नागिरी जिल्हयासाठी प्रत्येकी त्रेपन्न हजार रुपयाचे दोन धनादेश जिल्हाधिकारी यांच्या नावाने कोकण विभागीय महसूल आयुक्त विलास पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

यावेळी एन.पी.जाधव उपजिल्हाधिकारी (निवृत्त), आर.एन गरुड उपजिल्हाधिकारी (निवृत्त), जी.के.पष्टे नायब तहसिलदार (निवृत्त), सी.एम.भोसले तहसिलदार (निवृत्त), एस.आर.नाखवा तहसिलदार (निवृत्त) उपस्थित होते.

---

Rao Saheb

Adv. K. P. SAYED
ADVOCATE

**Public Notice**

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S. D.) PANVEL AT PANVEL

Civil Misc. Application No. 825 of 2021
Exh No. : 8/D
N.D. 8/9/2021

Mr. Zuber Nizamuddin Hamdule
Age 36 years, Occupation- Service,
Indian Inhabitant, residing at Flat No.406,
on the 4 th Floor, Pragati Sparsh,
Plot No.206, Sector-19, Ulwe,
Taluka-Panvel, Dist. Raigad 400614 Applicant

Whereas the above named Applicant has filed an application for Heirship certificate in respect of property mentioned in schedule hereunder written which stands in the name of deceased late Mrs. Aysha Nizamuddin Hamdule, Flat No.406, on the 4 th Floor, building known as Pragati Sparsh, Plot No.206, Sector-19, Ulwe, Taluka-Panvel, Dist. Raigad, area admeasuring 17.884 Sq. Mtrs. of Carpet area, 0.788 Sq. Mtrs. C. B. area, 2.481 Sq. Mtrs. of Enl. Balcony area, 2.295 Sq. Mtrs. of Pro. Terrace area, 7.950 Sq. Mtrs. of Terrace area, Deceased late Mrs. Aysha Nizamuddin Hamdule died on 26/07/2020 at Civil Hospital, Ratnagiri, Maharashtra, leaving behind the Applicant as legal heir.

If anyone has any right, share, claim in the above said Property should appear in person or through their advocates within 30 days from the date of publication of this notice, if no one appear and object the application, this court will proceed to pass the necessary orders.

**SCHEDULE OF PROPERTY**

Name of deceased: Mrs. Aysha Nizamuddin Hamdule

Deceased left the following property/Flat ;

Flat No.406. on the 4th Floor, building known as Pragati Sparsh, Plot No.206, Secctor-19, Ulwe, Taluka-Panvel, Dist. Raigad, area admeasuring 17.884 Sq. Mtrs, of Carpet area, 0.788 Sq. Mtrs. C. B. area, 2.481 Sq. Mtrs. of Enl. Balcony area, 2.295 Sq. Mtrs. of Pro. Terrace area, 7.950 Sq. Mtrs. of Terrace area.

GIVEN UNDER MY HAND AND SEAL OF THE COURT On this 23 day of 08, 2021

Court Seal

Sd/-
Asst. Superientendent
Civil Court, S.D. Panvel

---

श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.प्रशांत म. भोईर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१११६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०४/१०/२०२१

१) श्रीमती.लक्ष्मी विष्णू पाटील
२) श्री.निलेश विष्णू पाटील
३) श्री.सुदर्शन विष्णू पाटील
तिघे रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६
४) सौ.वैशाली अजित कर्णेकर
रा.मु.पो.शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२२१ अजदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. विष्णू द्वारकानाथ पाटील हे दि.१८/०४/२०२१ रोजी न्यु मिलेनिअम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, सानपाडा, नवी मुंबई येथे मयत झाले असून, त्यांच्या आई कै.काशिबाई द्वारकानाथ पाटील ह्या अनेक वर्षापर्वी मु.पो. उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या असून त्याचे मृत्यूची नोंद कोणत्याही तत्सम कार्यालयात उपलब्ध नाही. अर्जदार क्र.१ ह्या कै.विष्णू द्वारकानाथ पाटील यांच्या विधवा पत्नी असून अर्जदार क्र.२ ते ४ ही त्यांची मुले आहेत.

सबब अर्जदार क्र.१ ते ४ हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. कै. विष्णू द्वारकानाथ पाटील यांचे नावे असलेल्या मौजे : उलवे आणि तरघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकत व घर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | गावाचे नाव | यु.केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | उलवे | २२६ | ६२ | ४ | ४-३७-० |
| | | | ६३ | २ | १-३१-० |
| | | | ६४ | ५ | ०-३६-० |
| | | | ६६ | २२ | ०-३०-० |
| २ | तरघर | १४३ | ९ | ० | १-०६-० |
| | | | १६ | ७ | ०-०४-८ |
| | | | १६ | २४ | ०-१२-० |

| अ.नं. | गावाचे नाव | घर क्र. | युनिट केस क्र. | सर्वेक्षण क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | उलवे | १२५ | ULV-ICIG-58 | UL-137,138,139 | १८५.१९ |

वरील घर मिळकतीचे संपादनाच्या मोबदल्यात सिडकोने खालीलप्रमाणे भूखंडाचे वाटप केलेले आहे.

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे (पुष्पक) | २४ | १५२ | ५६० चौ.मी. |

येणेप्रमाणे जमीन मिळकती असून कै.विष्णू द्वारकानाथ पाटील मृत्यूपश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार क्र.१ ते ४ यांचे नावे अत्यावश्यक तो वारसद-ाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलामार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२३/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोटाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.उदय मोकल

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब 'क'स्तर याचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५००/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/१०/२०२१

(कै.कलुम्म्कल स्कारिया अलेक्झेंडर कायदेशीर वारस)
१) श्री.ग्लॅडी कलुम्म्कल अलेक्झेंडर (मुलगा)
वय : ५५ वर्षे, धंदा : नोकरी
अे-१०६ हॉल रोड, मान्सुझा अपार्टमेंट,
कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०००७०
२) श्रीमती.लव्हली वर्गीसे उर्फ
लव्हली कलुम्म्कल अलेक्झेंडर (मुलगी)
वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी
सध्या रा.२८६२ वॉलनर हिल्स स्ट्रीट फिलोडिल्फिया,
पी ए १९१५२ युएसए,
भारतीय पत्ता : अे-१०६, हॉल रोड, मान्सुझा अपार्टमेंट,
कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०००७०
३) श्रीमती.चिनम्मा कलुम्म्कल अलेक्झेंडर (पत्नी)
वय : ८० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.अल केटबी बिल्डींग, फ्लॅट नं.२८, २३३/६ बी,
अल क्वासीस, दुबई, यु.अे.ई,
भारतय पत्ता : अे-१०६, हॉल रोड, मान्सुझा अपार्टमेंट,
कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०००७० अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. कलुम्म्कल स्कारिया अलेक्झेंडर, यांचे दि.२६/०३/२००७ रोजी टेंपल युनिव्हर्सिटी हॉस्पिटल फिलाडेल्फिया, युएसए, येथे निधन झालेले आहे. कै. कलुम्म्कल स्कारिया अलेक्झेंडर यांच्या मृत्यूपश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै. कलुम्म्कल स्कारिया अलेक्झेंडर कायदेशीर वारस आहेत.

अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.कलुम्म्कल स्कारिया अलेक्झेंडर यांनी नवीन पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित निवासी सदनिका खरेदी केलेली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**नवीन पनवेल, प्लॉट नं.१९, सेक्टर : १६ ई, ता.पनवेल, जि.रायगड येथील निवासी सदनिका**

| बिल्डींगचे नाव | मजला | फ्लॅट नं. | क्षेत्रफळ चौ.फूट |
|---|---|---|---|
| गॉडस ग्रेस | पहिला | अे/१०२ | ८६१ |

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०८/२०२१

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोटाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

राव साहेब

अर्जदाराचे वकील
श्रीमती.सीमा जोशी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.न्यायाधिश यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९७८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०९/२०२१

१) श्रीमती.महेंद्र उत्तमराव इंदुरकर (मुलगा)
वय : ५८ वर्षे, व्यवसाय :
सध्या रा.पत्ता १०१, कुणाल ३ प्लॉट नंबर २५०/१/२,
सेक्टर २१, नेरुळ नवी मुंबई-४००७०६ अर्जदार क्र.१
२) श्रीमती.विद्या बळीराम काण्णव (मुलगी)
वय : ६४ वर्षे, व्यवसाय :
सध्या राहणार पत्ता प्लॉट नं.११, ओम स्वरुप गुलमोहर कॉलनी,
डी.पी.रोड, कोथरुड पुणे, महाराष्ट्र ४११०३८ अर्जदार क्र.२
३) श्रीमती.वनिता चंद्रशेखर नाईक (मुलगी)
वय : ६२ वर्षे, व्यवसाय :
सध्या रा.पत्ता : फ्लॅट नंबर ०७, प्लॉट नं.१४,
मोहिनी धाम, सी.एच.एस.बालाजी मंदिर जवळ, शिवगंगा नगर,
अंबरनाथ (इ.), जिल्हा : ठाणे अर्जदार क्र.३
४) श्री.महेश उत्तमराव इंदुरकर
वय : ५३ वर्षे, व्यवसाय :
सध्या रा.पत्ता १०२, कुणाल ३ प्लॉट नंबर २५०/१/२,
सेक्टर २१, नेरुळ नवी मुंबई-४००७०६ अर्जदार क्र.४
५) मयत श्री.मकरंद उत्तमराव इंदुरकर (मुलगा)
५/१) श्रीमती.माधुरी मकरंद इंदुरकर
(मयत श्री.मकरंद उत्तमराव इंदुरकर यांची पत्नी)
वय : ५९ वर्षे, व्यवसाय :
सध्या रा.पत्ता : फ्लॅट नंबर ३०३, ३ रा.मजला, ए विंग, कोरल
क्रेस्ट सीएचएसएल से.२३, नवी मुंबई-४००७०६ अर्जदार क्र.५/१
५/२) गौरी मकरंद इंदुरकर
(मयत श्री.मकरंद उत्तमराव इंदुरकर यांची मुलगी)
वय : ३२ वर्षे, व्यवसाय :
सध्या रा.पत्ता : फ्लॅट नंबर ३०३, ३ रा.मजला, ए विंग, कोरल
क्रेस्ट सीएचएसएल से.२३, नवी मुंबई-४००७०६ अर्जदार क्र.५/२
५/३) श्रुती मकरंद इंदुरकर
(मयत श्री.मकरंद उत्तमराव इंदुरकर यांची मुलगी)
वय : वर्षे, व्यवसाय :
सध्या रा.पत्ता : फ्लॅट नंबर ३०३, ३ रा.मजला, ए विंग, कोरल
क्रेस्ट सीएचएसएल से.२३, नवी मुंबई-४००७०६ अर्जदार क्र.५/३
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

वरील अर्जदार नंबर १ ते ४ यांची आई व अर्जदार नं.५/१ यांची सासू, अर्जदार नं.५/२ आणि ५/३ यांची आजी श्रीमती.तारा उत्तमराव इंदुरकर हे दि.२६/०५/२०१३ रोजी मयत नेरुळ नवी मुंबई येथे यांचे निधन झाले. श्रीमती.तारा उत्तमराव इंदुरकर यांचे (मालकीचा ३६ हिस्सा) सोबत त्यांचा मुलगा श्री.महेंद्र उत्तमराव इंदुरकर (मालकीचा ३२ हिस्सा) आणि सुन श्रीमती.मानसी महेंद्र इंदुरकर (मालकीचा ३२ हिस्सा) खालील मिळकतीबाबत त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे वारस म्हणून वारसदाखला मिळण्याबाबत अर्ज दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नंबर १२०१, सी विंग, १२ वा मजला, प्रशंसनीय क्षेत्र ५०.२४४ चौ.मीटर्स, प्लॉट नंबर १७ ए, १८, १९, २० हरी हेरिटेज बिल्डींग सेक्टर २२, कामोठे, नवी मुंबई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिला आहे. तरी वरील वारसाला दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्याबाबत तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांस विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२३/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोटाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

## संक्षिप्त...

# मोठीजुई येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

उदानी फाउंडेशन वाशी, नवी मुंबई यांच्या वतीने आणि मोठीजुई सामाजिक विकास युवा मंच यांच्या विशेष प्रयत्नाने मोठीजुई माध्यमिक शाळेच्या विद्यार्थी विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. गेले चार वर्षे वाशी नवी मुंबई मधील नामांकित सामाजिक संस्था उदानी फाउंडेशन यांच्या वतीने उरण तालुक्यातील मोठीजुई माध्यमिक शाळेतील विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन त्यांना प्रोत्साहित केले आहे. कार्यक्रमाच्या सुरवातीला शाळेच्या शिक्षिका रजनी तांडेल यांनी शब्द सुमनांनी सर्वांचे स्वागत केले. तदनंतर सर्व पाहुण्यांचे गुलाब पुष्प देउन त्यांचे सन्मान करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक के.एच.भोईर यांनी आपल्या शाळेची परिस्थिती, उंचावळेला दर्जा, शाळेतील विद्यार्थ्यांची घौडदौड, गेल्या १९ वर्षापासून शाळा विना अनुदानीत तत्वावर चालत असलेली सर्व हकीकत सांगितली. पुढील वर्षी सर्व विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त वस्तू वाटप करण्याचं आश्वासन उदानी फाउंडेशनच्या वतीने देण्यात आले. आभार प्रदर्शन शाळेचे प्राचार्य किशोर भोईर यांनी मानले.कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने शाळेतील शिक्षक वृंदानी विध्यार्थ्यांसाठी सामाजिक अंतर आणि सॅनिटायजरची व्यवस्था केली होती. यावेळी उदानी फाउंडेशन च्या वतीने विना गांधी, प्रिया पाटील, रोहित लोहोट, अतुल जेढे तर मोठीजुई सामाजिक विकास युवा मंचचे राजेश भोईर, विवेक पाटील, पवन जोशी, शाळेचे मुख्याध्यापक किशोर भोईर, नामदेव ठाकरे, रंजना मोकल, रवि कदम, नितेश पाटील, शशिकांत पाटील, उत्तम पाटील उपस्थित होते.




**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# लोकप्रतिनिधीचा राज्य सरकारवर दबाव नाही : पंडित पाटील

## खारलाईन खात संपूर्ण पॅरलाईज झालेलं आहे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मुंबईतून नागपूरला जाणारे दहा रस्ते आ-हेत. मात्र कोकणात जाणार एकच रस्ता आहे तो पण लवकर होत नाही त्यामुळे इथल्या लोकप्रतिनिधींचा राज्य सरकारवर दबाव नाही असे वक्तव्य माजी आमदार पंडित पाटील यांनी केलं.

श्रीवर्धन तहसीलदार कार्यालयात आज पेट्रोल, गॅस सिलेंडर आदीं जीवनावश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किमती कमी करण्यासाठी तहसीलदार यांचेकडे शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आलं यावेळी बोलताना रायगड जिल्ह्याला २४० किलोमीटरचा समुद्र किनारा लाभलेला आहे समुद्रच भरतीच पाणी व पावसाचं पाणी दोन्ही मिळून शेती व अनेक भागात पाणी घुसत आहे. मात्र याठिकाणच खारलाईन विभाग पॅरालाईज झालं असल्याचं वक्तव्य यावेळी पंडित पाटील यांनी केलं. ज्या ज्या ठिकाणी लोकवस्तीत व शेतीत पाणी घुसत आहे त्या ठिकाणी सरकार बंधारे बांधत नसेल तर तहसीलदार यांनी रोजगार हमीतून खारलाईनची काम करून समुद्राच्या



पाण्याखाली जाणारी शेती वाचवावी अशी आग्रही मागणी यावेळी पाटील यांनी केली.

अंतुले साहेबांच्या बालेकिल्ला असलेल्या या मतदार संघातून अनेक मंत्री झाले. आता पत्र दाखवत असतील नारळ फोडत असतील पण हा जनतेचा पैसा आहे. कर रुपात प्राप्त झालेला पैसा जनतेच्या कामासाठी वापरला पाहीजे. रायगड जिल्ह्याच्या शेवटच्या टोकात असलेला श्रीवर्धन तालुका या तालुक्यात कोपऱ्यातआज उपजिल्हा रुग्णालयात आहे मात्र आय सी यु आणि डायलासेस सुविधा उपलब्ध नाही जयंत पाटील यांच्या माध्यमातून आम्ही त्यासाठी

**महागाईच्या विरोधात हल्लाबोल करून बीजेपीने सत्ता मिळवली आणि आता दिवसेंदिवस पेट्रोल डिझल गॅस सिलेंडर व इतर जीवनावश्यक वस्तू महाग होत आहेत त्यांच्या किमती कमी कराव्यात अशी मागणी असलेलं पत्र यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तहसीलदार श्रीवर्धन यांचेकडे सुपूर्द करण्यात आले.**

प्रयत्न करणार आरोग्यमंत्री यांचेकडे पाठपुरावा करणार. चक्रीवादळात नुकसानभरपाई मिळाली मात्र जनतेत समाधान नसल्याचं देखील पाटील यांनी सांगितलं कोरोना काळात लोकांचा व्यवसाय बुडाला आहे लोकांना जेवणाचे हाल होत आहेत. यावेळी श्रीवर्धन तालुका चिटणीस वसंत यादव आदी शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुरुड तहसीलदारांना निवेदन...

# दरवाढी विरोधात शे.का.पक्षाचा एल्गार

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

**राज्यातील जनता महागाईने त्रस्त असून शासनाकडून घरगुती गॅस, पेट्रोल डिझेल व जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत वेळोवेळी सातत्याने होणा-या दरवाढीच्या निषेधार्थ आज शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तालुका चिटणीस मनोज भगत मान्यवरांच्या हस्ते मुरुड तहसीलदारांना एक निवेदन देण्यात आले.यावेळी सदर निवेदन नायब तहसिलदार रविंद्र सानप यांनी स्विकारले.**

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, शासनाकडून घरगुती वापरात असलेल्या गॅस सिलिंडरच्या किमतीत सातत्याने वाढ केली जात आहे.त्यामुळे रायगड जिल्ह्यासह राज्यातील गोरगरिबांसह सर्व नागरिकांना मोठ्याप्रमाणात आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.गरिबांना तर एक वेळचे जेवण मिळणे देखील दुरापास्त झाले आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे अनेकांचा रोजगार बंद पडला आहे तर अनेक जण बेरोजगार झालेले असून अनेक कुटुंबातील कमवत्या व्यक्ती कोरोना महामारी मुळे गमावल्या असल्यामुळे त्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.त्यातून सावरत असतानाच चक्रिवादळे, अतिवृष्टी, महापूर तसेच दरडी कोसळल्याने अनेकांचे संसार उद्धवस्त झाले आहेत.मात्र शासनाकडून गॅस सिलिंडरच्या किमती कमी न होता त्यात सातत्याने वाढ होत आहे.त्यातच शासनाकडून दिली जाणारी सबसिडी बंद करण्यात आली आहे. त्यामुळे गोरगरिबांसह सर्व नागरिकांना मोठ्याप्रमाणात आर्थिक परिस्थितीला तोंड द्यावे लागते आहे.



ग्रामीण भागातील माता-भगीनींना धुरापासून कायमची मुक्ती मिळावी यासाठी स्वच्छ इंधन - बेहेतर जीवन अशी घोषणा देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १ मे २०१६ पासून उज्वला गॅस योजना सुरू करण्यात आली.

परंतु गॅस सिलिंडरची किंमत आता ९०० रुपयांवर गेली असून हा दर महिन्याचा खर्च ग्रामीण भागातील जनतेला परवडणारा नाही. तसेच पेट्रोल डिझेल व जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत झालेल्या भरमसाठ वाढीमुळे नागरिकांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.


तरी शासनाकडून घरगुती वा-परात आवश्यक असलेल्या गॅस सिलिंडरच्या तसेच पेट्रोल डिझेल व जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कमी करण्यात याव्यात. अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने या निवेदनाद्वारे करण्यात येत असून आपणाकडून आमच्या पक्षाच्या भावना सरकार कडे सादर करण्यात याव्यात.असे निवेदनात म्हटले आहे.

शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस मनोज भगत, मनोहर बैले,विजय गिदी, मोतीराम पाटील, पंचायत समितीच्या माजी सभापती निता गिदी यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# खारपाडा टोल नाक्याजवळ गंठण खेचून पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटारसायकलीवरून आलेल्या दोघा अज्ञात इसमांनी एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण खेचून पसार झाल्याची घटना तालुक्यातील केळवणे-खारपाडा टोल नाका रोडवर कातकरवाडी बस स्टॉपजवळ घडले आहे.



सुनिता मोकल (वय-५५) या रिक्षातून साईगाव येथे येऊन त्या रिक्षातून उतरल्यावर डोक्यावर हेलमेट घातलेल्या दोन अनोळखी इसमांनी मोटारसायकलीवरून येऊन त्यामागील पाठीमागे बसलेल्या इसमाने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसका देऊन खेचली यात साधारण १० तोळ्याचे अर्धवट तुटलेले गंठण ज्याची किंमत जवळपास ९० हजार आहे.


खेचून ते पसार झाले आहेत. या घटनाची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## प्रलंबित मागण्यांसाठी एमएसईबीचे अभियंते जाणार संपावर

# ६ सप्टेंबर पासून संपाचा इशारा

**दै.रायगड नगरी । पेण**

महापारेषण, महावितरण व महानिर्मिती या वीज क्षेत्रात काम करणाऱ्या अभियंत्यांचे मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नां बाबत उदासीन असलेल्या महाराष्ट्र शासनाला जागे करण्यासाठी या तिन्ही विभागातील अभियंते ६ सप्टेंबर पासून संपावर जाणार असल्याची माहिती सब ऑड्रीनेट संघटनेचे महाराष्ट्राचे जनरल सेक्रेटरी संजय ठाकूर यांनी 'रायगड नगरी' जवळ बोलताना दिली आहे.



वीज वितरण कंपनीच्या महापारेषण, महावितरण व महानिर्मिती या तिन्ही क्षेत्रातील अभियंते कोविड काळासह नैसर्गिक आपत्ती मध्ये देखील जोखीम घेऊन आपले कर्तव्य पार पाडत आहेत. महापारेषण विभागाच्या प्रशासनातर्फे मागील चार वर्षापासून स्टाफ सेटअपच्या नावाखाली अभियंत्यांची पदे कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. याबाबत संघटनेची प्रशासनाबरोबरच चर्चा सुरू असताना संघटनेला विश्वा्सात न घेता कोणत्याही तांत्रिक बाबींचा विचार न करता १५ जून २०२१ पासून अन्यायकारी स्टाफ सेटअप लागू करून परिमंडळ स्तरावर त्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. एकीकडे मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व दुसरीकडे नव्याने लागू करण्यात आलेला स्टाफ सेटअप यामुळे महापारेषण कंपनीची प्रणाली बंद पडून ग्राहक से-वेवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. तसेच कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. या अन्यायकारी स्टाफ सेटअप मुळे ५०७ उपकार्यकारी अभियंता व १४० अतिरिक्त कार्यकारी अभियंते यांची पदे कमी होणार आहेत. तसेच भविष्यामध्ये त्यांच्या पदोन्नतीमध्ये गंभीर परिणाम होणार असल्यामुळे या अभियंता मध्ये तीव्र स्वरूपाची नाराजी असल्याचे संजय ठाकूर यांनी सांगितले.

महावितरण मधील आवश्यक रिक्त पदे ही संकल्पना मागील वर्षापासून बदली धोरणांमध्ये राबवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याला प्रखर विरोध करत संघटनेच्या प्रतिनिधींनी ऊर्जामंत्री डॉक्टर नितीन राऊत यांची भेट घेतली होती. त्यावेळी ऊर्जा मंत्र्यांनी सदर धोरण मी पुढील वर्षी लागू न करण्याबाबत आश्वासन दिले होते. मात्र याच वर्षी पासून हे धोरण राबविण्याचा निर्णय महावितरण प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे ग्राहक सेवेवर परिणाम होऊन कंपनीची प्रतिमा मलीन होऊ शकते. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील अभियंत्यांच्या विनंती बदल्या सुद्धा रखडणार आहेत. यामुळे देखील अभियंता मध्ये नाराजी असल्याचे जनरल सेक्रेटरी संजय ठाकूर यांनी सांगितले.

### अनेक मागण्या प्रलंबित

महापारेषण कंपनी मध्ये २०१५ पासून महावितरण व महानिर्मिती कंपनीमध्ये दोन वर्षापासून पदोन्नती झालेली नाही. महानिर्मिती कंपनी मधील एकतर्फी बदली धोरण व फॅक्टरी भत्ता लागू न करणे, संघटनेला विश्वासात न घेता प्रशासनातर्फे नवीन भरती धोरण व सेवा विनियम एकतर्फी लागू करणे, वीजबील वसुलीबाबत प्रशासन कडून कर्मचाऱ्यांवर होत असलेला दबाव व त्यामुळे कर्मचाऱ्यांना होणारी मारहाण होण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना लोकसेवक दर्जा मिळावा अशा अनेक मागण्या प्रलंबित आ-हेत. या मागण्यांकडे प्रशासनाने अनेक वर्षांपासून दुर्लक्ष केले असल्याने ६ सप्टेंबर २०२१ पासून संपावर जाणार असल्याची माहिती सब ऑड्रीनेट संघटनेचे महाराष्ट्राचे जनरल सेक्रेटरी संजय ठाकूर यांनी दिली आहे.

# धाकटा खांदा गाव परिसरातील सर्व्हिस रोडची कामे तातडीने करा

## शिवसेनेची सिडकोकडे मागणी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

धाकटा खांदा गाव परिसरातील सर्व्हिस रोडची कामे तातडीने सिडकोने करून द्यावी अशी मागणी आज शिवसेनेच्या शिष्टमंडळाने सिडकोचे मुख्य अभियंता अधिक्षक मोहिले यांची भेट घेऊन केली आहे.

यावेळी शिवसेना पनवेल विधानसभा संघटक दीपक निकम, शाखाप्रमुख भास्कर पाटील, मा. नगरसेवक विश्वास म्हात्रे, मुकुंद पाटील, सुकाजी भगत, मनोहर म्हात्रे, नंदकुमार पां. म्हात्रे, संतोष म्हात्रे, परशुराम म्हात्रे, दिनकर म्हात्रे, नरेश म्हात्रे आदी उपस्थित होते. धाकटा खांदा हे गाव सिडको हद्दीत मोडतो. गावाच्या पश्चिम बाजूकडून जेएनपिटी ते कळंबोली हा महामार्ग जातो व तेथे महामार्गावर ब्रीज आहे व बाजूने सर्व्हिस रोड आहे. याच बाजूला खांदेश्वर रेल्वे स्टेशन आहे. त्यामुळे या बाजूकडून रोज हजारो नोकरदार वर्ग स्टेशनकडे जात असतात. परंतु येथे कायमस्वरूपी रस्ता नसल्याने नागरिकांना पावसाळ्या फार त्रास सहन करावा लागतो. तरी सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांनी या गावाची पाहणी करून गाव ते सर्व्हिस रोडपर्यंत रस्ता करून द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे. या मागणीची दखल सिडकोचे अधिकारी मोहिले व मुलाणी यांनी घेऊन लवकरात लवकर रस्ता करण्याचे आश्वासन दिले आहे.

# अंकुर फाउंडेशनकडून आदिवासी विद्यार्थ्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

अनेक वर्षापासून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या माणगांव तालुक्यातील लोणेरे येथील अंकुर फाउंडेशन व गणेश फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने दुर्गम व डोंगराळ भागातील जिल्हा परिषदेच्या नांदवी आदिवासी शाळेला जिवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना पोषण आहार घेण्यासाठी व त्यांच्या पालकांना आवश्यक भांडी, कपडे, खाऊ व इतर वस्तूंचे वाटप नुकतेच करण्यात आले.

हे वाटपाचे सर्व साहित्य डोक्यावर घेऊन डोंगराळ भागातील या शाळेपर्यंत दोन किलोमीटर पायी चालत जाऊन अंकुर फाउंडेशनच्या सर्व सदस्यांनी व आदिवासी बांधवांच्या समवेत सर्व वस्तूंची वाहतूक करत आदिवासी शाळेला योगदान देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. सदर कार्यक्रमासाठी अंकुर फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अमित खैरे, सचिव चिंतामणी बटवले, मार्गदर्शक मंगेश पेठे व इतर सदस्य उपस्थित होते. शाळेतील शिक्षक संदिप जंगम, पुरारकर, शालेय व्यवस्थापन समितीच्या सौ. जाधव, इतर सदस्य व आदिवासीवाडी ग्रामस्थ-पालकांनी याबद्दल या दानशूर संस्थांचे आभार व्यक्त केले.



# तळा पोलीस ठाणे लवकरच घेणार मोकळा श्वास

**दै.रायगड नगरी । तळा**

तालुका निर्मिती होऊन २१ वर्षाचा कालावधी लोटला असून याकाळात अनेक वेळा स्वतंत्र पोलीस ठाणे व्हावे याची मागणी तळा पत्रकार संघ तालुका समन्वयक समीती व पोलीस अधीक्षक सो. अलिबाग यांच्याकडे पाठपुरावा करीत होते. शहरा-पासून दिड कि.मी अंतरावर असल्याने रात्री अपरात्री ग्रामीण भागात घटना घडल्यानंतर काळोखातून यावे लागत होते. सदर वास्तव निदर्शनास आणून देऊन तालुक्याला शोभेल असे पोलीस ठाणे, पोलीस कर्मचारी वसाहतीची मागणी केली जात असताना शासनाने नगरपंचायत हद्दीतील सि.सर्वे नं.१२९९ जवळ पास ७ गुंठे जागा पोलीस ठाणे कडे हस्तांतरित केली जात असल्याने शहरालगत अत्याधुनिक पध्दतीचे सर्व सोईयुक्त पोलीस ठाणे लवकरच इमारत उभी रहाणार असल्याचे खात्रीशीर वृत्त आहे.

त्यामुळे इतके वर्ष जागे अभावी पोलीस ठाणेची होणारी धुसमट मोकळा श्वास घेईल. यापूर्वी तह-सील कार्यालयात पोलीस ठाण्याला तातडीने जागा उपलब्ध करून दिली होती. परंतु इमारत उभारणीत पोलीस ठाण्याचे नियोजन केले गेले नसल्याने सब रजिस्ट्रेशन कार्यालयाच्या ताब्यात देण्यात आल्यानंतर भाड्याने जागा पोलीस ठाणे साठी घ्यावी लागली. असणाऱ्या प्रतीकुल परिस्थितीत स्विकार करीत कसा तरी गाडा हाकलीत होते. आता मात्र मोकळ्या जागेत होत आहे.हे तालुक्याच्या विकासात एक महत्त्वाचे पाऊल पुढे होत आहे. या बरोबरच शासकीय कर्मचारी वसाहत, स्वतंत्र भूमी अभिलेख कार्यालय, तालुका कृषी अधिकारी कार्यालय अजूनही भाड्याने थाटलेली असून त्यांचा शासनाने जरूर विचार करून निर्णय घ्यावा. अशी देखील मागणी केली जात आहे.

मा.जिल्हाधिकारी सो.यांच्या आदेशान-सार तातडीची शासकीय जागेची मोजणी करण्यात आली असून हद्द कायम करण्यात आली आहे. त्याप्रमाणे नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही होईल.

**आर के दिवेकर,**
**उप अधिक्षक भुमी अभिलेख तळा**

